Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-II Feb. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# “नांदेड शहरातील अनुदानीत महाविद्यालयामधील अनुसूचित जातीतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींचे समायोजन व शैक्षणिक संपादन- एक अभ्यास”

संशोधक
**आम्रपाली रामराव भद्रे**
(एम.फिल प्रशिक्षणार्थी)
शिक्षणशास्त्र संकुल, स्वा.रा.ती.म. वि. नांदेड

## प्रस्तावना -

भारतीय समाजाने स्त्रिया, आदिवासी जमाती व अनुसूचित जातींना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्तीचे जीवन विकसित कण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. भारतात १९ व्या शतकात ज्योतिबा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीमाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. मागासवर्गातील आर्थिक दारिद्य , गुलामगिरी व कर्जबाजारीपणा दूर करण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय. स्त्री शिक्षण व सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

सर्व प्रकारच्या विषमतादर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करुन घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील मागासवर्गीय व वंचित घटकांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या हक्कासाठी व विकासासाठी कार्य केले. शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतःची जाणीव होते . म्हणून निसर्गदत्त शक्तीच्या आधारावर प्रत्येकास प्रगती करण्याची संधी मिळाली. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा अडसर येवू नये म्हणून लोकशाहीस पुरक अशा तत्वांची मांडणी केली. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यांचे पालन दैनंदिन, सामाजिक, कौटूंबिक व राजकीय जीवनात व्हावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. अस्पृश्य समाज व स्त्रीया यांना सामाजिक जीवनात अनेक वेळा अन्याय, अत्याचारांना बळी पडावे लागत होते त्यांचे जगण्याचे हक्कही डावलले जात होते. अन्यायकारक वागणूकीस त्यांना सामोरे जावे लागत होते विशेषता : स्त्रीया भारतीय समाजात दुर्लक्षिल्या जात होत्या आणि ही विषमता दूर करण्यासाठी सामाजिक लोकशाही प्राप्त करुन घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे. समाजातील प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील स्त्रीया किती पंगती आहेत ते पाहावे. म्हणुन समाजातील प्रत्येक स्त्री सुशिक्षित असली पाहिजे कारण शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतःची जाणीव होते व समाजात स्थान प्राप्त करण्यास महिला सक्षम बनतील त्याचबरोबर प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस सन्मानाने वागवू शकते व इतरांना समजून घेवू शकते व त्यातुनच व्यक्ती स्वतःचे जीवन सुधारु शकते.

१९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात १९७४ पर्यंत वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत सर्व मुला- मुलींना मोफत सक्तीच्या शिक्षणाचा निर्धार व्यक्त करण्यात आला होता परंतु आजही सर्वांपर्यंत शिक्षण पोहचू शकले नाही. प्राचीन रुढी परंपराचालीरीती यांना काही प्रमाणात फाटा देऊन आज सुशिक्षित मुली विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखवित आहेत परंतु विविध क्षेत्रामध्ये ज्या मुली काम करीत आहेत याचा विचार आपण केला तर त्या शहरी भागातील उच्चभू कुटूंबातील दिसून येतात. एखाद्या राष्ट्राला उभे करायचे असेल तर, प्रथम त्या देशातील मुलींना शिक्षण दिले पाहिजे. एखाद्या राष्ट्राकडून स्त्रीला दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्वावरुन या राष्ट्राची सांस्कृतीक उंची मोजता येते. राष्ट्राचा दर्जा उंचावण्यासाठी मुलींना शिक्षण देणे गरजेचे आहे.

आपण पाहतो अनेक कारणामुळे पालक आपल्या मुलींना शाळेत घालत नाहीत काही अडचणी व समस्यामुळे सामाजिक, आर्थिक, शारीरिक कारणामुळे त्यांना समान हक्कापासून दूर रहावे लागते. विशेषतः शिक्षणापासून दूर रहावे लागते. आजही ग्रामीण भागातील आदिवासी भागातील, भटक्या जाती- जमातींतील मुली अशिक्षित आहेत. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाजातील कुटूंबाना विशेषतः मुलींच्या शिक्षणाचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. आपल्या मानवी साधन संपत्तीच्या संपुर्ण

विकासासाठी गृह सुधारण्यासाठीआणि बालवयातील संस्कारक्षम वयात मुलांच्या चरित्र्याची योग्य घडन करण्यासाठी स्त्रीयांना दिले जाणारे शिक्षण हे पुरषाला दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षा अधिक महत्वाचे आहे.

उपस्थित संशोधन अनुसुचित जातातील विद्यार्थीनीचे समायोजन व शैक्षणिक संपादन जे की त्यांना जीवनात यश प्राप्त करण्यासाठी उपयोगी ठरेल या अनुषंगाने उपस्थित संशोधनात उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनीच्या समायोजन व संपादन यांचा अभ्यास केला आहे.

**संशोधनाची गरज :**

सध्याचा काळ हा खूप स्पर्धेचा काळ आहे शिक्षण घेत असतानांच्या काळात प्रत्येकी विद्यार्थी उच्च ज्ञान प्राप्त करुन जीवनात यश संपादन करतांना आपल्याला दिसून येते तसेच अनुसुचित जातीतील मुलींच्या शिक्षणा बाबतीत देखील ही गोष्ट प्रकर्षाने लागू होते.

उच्च माध्यमिक स्तरावर शिकणाऱ्या अनु. जातीतील मुलींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अर्थिक समस्या, कौटूंबिक समस्या सोडवून त्या परिस्थितीशी जूळवून घेऊन जीवनात शैक्षणिक यश प्राप्त करावे या करीता प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

- विद्यार्थ्यांनीना येणाऱ्या वेगवेगळ्या समस्यांचा अभ्यास करुन त्या महाविद्यालयीन वातावरणाशी कशाप्रकारे जुळवून घेतात व त्यांच्या शैक्षणिक समस्या कशा सोडवतात याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.
- अनुसुचित जातीतील विद्यार्थीनी आपल्या मित्र-मैत्रिणी व शिक्षक यांच्याशी कशाप्रकारे जुळवून घेतात व त्यांचे शैक्षणिक यश संपादनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.
- अनु. जातातील विद्यार्थीनीना कौटूंबिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक संपादनावर नकारात्मक होऊ नये हे अभ्यासणे गरजेचे आहे.

**संशोधनाचे महत्व :**

विद्यार्थ्यांना जवनात यशस्वी होण्यासाठी अनेक अडचर्णीना सामोरे जावे लागते. विद्यार्थ्यांच्या जीवनातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे शै. संपादन होय. शैक्षणिक प्रगती करुन घेण्यासाठी अनेक गोष्टीचा संबंध येतो विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती विविध गोष्टीवर अवलंबून असते शैक्षणिक यश प्राप्त करण्यासाठी विद्यार्थीनीना अनेक वेळा परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते व स्तत:च्या व्यक्तीगत कौशल्याचा उपयोग करुन यश संपादन करावे लागते.

- शैक्षणिक माध्यमिक स्तरावरील अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांनीं चे कौशल्य ओळखून त्यांना प्रोत्साहन देण्या ाठी प्रस्तुत संशोधनाचे महत्व आहे.
- अध्यापनामध्ये प्रभावी अध्यापन पध्दती तंत्राचा वापर करुन योग्य मार्गदर्शन करुन विद्यार्थीनीमध्ये अधिक ज्ञान ग्रहण करण्याची वृत्ती विकसित करण्यास व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यास प्रस्तुत संशोधानाचे महत्व आहे.
- विद्यार्थ्यांनींना अडचणी सोडवून परिस्थितीशी समायोजन साधतांना यश संपादनात अडथळे येवू नयेत व त्यांच्या शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा व शैक्षणिक दर्जा उंचावा या करीता संशोधनाचे महत्व आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. अनुसुचित जातीतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांनी कौटूंबिक व आर्थिक स्थितीशी कशाप्रकारे समायोजन साधतात हे अभ्यासणे.
२. उच्च माध्यमिक स्तरावरील अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांनी सामाजिक स्थितीशी कशाप्रकारे समायोजन साधतात याचा अभ्यास करणे.
३. अनुसुचित जातीतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनी महाविद्यालयीन वातावरणाशी कशा प्रकारे समायोजन साधतात याचा अभ्यास करणे.

४. अनुसुचित जातीतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनी शिक्षकांशी व इतर विद्यार्थ्यांशी कशा प्रकारे जुळवून घेतात हे अभ्यासणे.
५. अनुसुचित जातीतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थीनींच्या शैक्षणिक संपादनाचा शोध घेणे.

**संशोधनाची साधने :-**

संशोधकाने प्रस्तुत संशोधनसाठी १) शेक्षणिक समायोजन या प्रश्नावलीचा वापर केला आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. संशोधकाने संशोधनात इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यीनींच्या समायोजन व संपादन या चलांचा अभ्यास कण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे.

**निष्कर्ष :-**

- उच्च माध्यमिक स्तरावरील अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांनी आर्थिक, कौटूंबिक, सामाजिक परिस्थितीशी चांगल्या प्रकारे जुळवून घेतात.
- - उच्च माध्यमिक स्तरावरील अनुसुचित जातीतील विद्यार्थीनी त्यांच्या मित्र मैत्रिणींशी नेहमी संपर्कात असतात व महाविद्यालयात गेल्यावर नेहमी प्रसन्न असतात.
- अनु. जातीतील विद्यार्थीनी त्यांच्या शिक्षकांचा आदर करतात. व निसंकोचपणे त्यांच्या शिक्षकांना प्रश्न विचारतात.
- अनु. जातीतील विद्यार्थीनींना अभ्यास करणे कंटाळवाने वाटते परंतु, अभ्यास विषयक चर्चा करण्यास जास्त आवडते व त्यांचे शैक्षणिक यश चांगले आहे.

**संदर्भसूची :**

१.प्रा. रा. शं. मुळे व उमाटे वि.तु., (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
२.डॉ. वि.रा. भिंताडे (२०१०) शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्यनूतन प्रकाशन.
३.जगताप ह.ना., शैक्षणिक मानसशास्त्रीय अधिष्ठान
४.सामाजिक परिवर्तन डॉ. सुधा काळदाते, डॉ. नारायण चौधरी, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.
५.प्रा. अविनाश डोळस, डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रा. अरुणा पेंडसे, प्रा. राजीव साने, डॉ. नारायण चौधरी, सामाजिक चळवळी, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नांदेड

ISSN 2349-638X
www aiirjournal.com